# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 07 August 2024

## Time 18.10 to 18.20

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक – ०७ ऑगस्ट २०२४ सायंकाळी ६.१०

****

- पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कुस्तीपटू विनेश फोगाट हिला अंतिम लढतीस अपात्र ठरवल्याबद्दल भारतीय ऑलिम्पिक संघाकडून तीव्र निषेध;सर्व शक्यतांची पडताळणी करण्याचे पंतप्रधानांचे निर्देश
- कृषीपूरक व्यवसायांसाठी कमी व्याजदरात कमी मुदतीची कर्ज उपलब्ध करून देण्याची रिझर्व्ह बँकेची इतर बँकांना सूचना
- राज्यातल्या जलप्रकल्पांची क्षमतावाढ करण्याची गरज उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून व्यक्त

आणि

- तिसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात श्रीलंकेचं भारतासमोर विजयासाठी २४९ धावांचं आव्हान

****

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताची कुस्तीपटू विनेश फोगाट हिला अपात्र ठरवल्याबद्दल भारतीय ऑलिम्पिक संघाने आंतरराष्ट्रीय कुस्तीसंघाकडे तीव्र निषेध नोंदवला आहे. केंद्रीय क्रीडामंत्री डॉ मनसुख मांडवीय यांनी आज लोकसभेत याबाबत केलेल्या निवेदनात ही माहिती दिली. यासंदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय ऑलिम्पिक संघाच्या अध्यक्ष पी टी उषा यांना योग्य कार्यवाही करण्याचे तसंच सर्व शक्यता पडताळून पाहण्याचे निर्देश दिले असल्याचं, मांडवीय यांनी सांगितलं. विनेश फोगाट यांना या ऑलिम्पिक स्पर्धेसाठी कुस्ती प्रशिक्षण तसंच इतर व्यवस्थापनाकरता केंद्र सरकारकडून आतापर्यंत करण्यात आलेल्या आर्थिक मदतीचं विवरणही क्रीडामंत्र्यांनी सदनासमोर सादर केलं.

या मुद्यावरुन आज लोकसभेत विरोधकांनी गदारोळ केला. यासंदर्भात क्रीडामंत्र्यांनी जबाब देण्याची मागणी विरोधकांनी लावून धरली होती.

दरम्यान, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू तसंच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विनेश प्रकरणी नाराजी व्यक्त केली आहे. राष्ट्रपतींनी या स्पर्धेत विनेशच्या आतापर्यंतच्या कामगिरीचं कौतुक करत, भावी विश्वविजेत्यांसाठी ती प्रेरणा ठरेल, सध्याच्या प्रसंगात सगळा देश तिच्यासोबत असल्याचं म्हटलं आहे. पंतप्रधानांनी ट्वीटरवरच्या संदेशातून विनेशला धीर देत, ती विजेत्यांमधली विजेती असल्याचं म्हटलं आहे. या परिस्थितीवर मात करून विनेश दमदार पुनरागमन करेल, असा विश्वासही पंतप्रधानांनी व्यक्त केला आहे.

ऑलिम्पिकच्या कुस्ती प्रकारात ५० किलो वजनी गटात विनेश फोगाट आज रात्री सुवर्णपदकासाठीची कुस्ती खेळणार होती. मात्र आज सकाळी तिचं वजन काही ग्रॅम जास्त भरल्याने तिला अपात्र घोषित करण्यात आलं.

दरम्यान कुस्तीच्या ५३ किलो वजन गटात आज भारताच्या अंतिम पंगालचं आव्हान संपुष्टात आलं. महिलांच्या सांघिक टेबल टेनिस स्पर्धेत आज मनिका बत्रा, श्रीजा अकुला आणि अर्चना कामत यांच्या संघाचा उपांत्यपूर्व फेरीत जर्मनीच्या संघाने पराभव केला.

****

ॲथलेटिक्स मध्ये उंच उडी, ट्रिपल जंप या प्रकारातल्या पहिल्या फेरीत भारतीय खेळाडू सहभागी होणार आहेत. तर तीन हजार मीटर अडथळ्यांच्या शर्यतीच्या अंतिम फेरीत अविनाश साबळे सहभागी होणार आहे. भारतीय वेळेनुसार मध्यरात्री दीड वाजेनंतर ही शर्यत होईल. भारोत्तोलनात महिलांच्या ४९ किलो वजनी गटात मीराबाई चानू सहभागी होणार आहे.

****

दरम्यान, ऑलिम्पिक स्पर्धेत नेमबाजीत दोन कांस्य पदकं जिंकणारी नेमबाज मनु भाकर आणि एक कांस्यपदक पटकावणारा महाराष्ट्राचा स्वप्नील कुसाळे आज स्वदेशी परतले. आज सकाळी दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर युवा आणि क्रीडा मंत्रालयाचे अधिकारी आणि क्रीडा चाहत्यांनी त्यांचं जल्लोषात स्वागत केलं.

****

गेल्या दशकभरात कर संरचनेत मोठे बदल करण्यात आल्याचं, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. त्या आज लोकसभेत वित्त विधेयकावरच्या चर्चेला उत्तर देत होत्या. सरकारने घेतलेल्या निर्णयामुळे मध्यमवर्गीयांना दिलासा मिळाला तसंच, छोट्या व्यावसायिकांनाही मोठा फायदा झाल्याचं अर्थमंत्र्यांनी नमूद केलं. विरोधकांनी केलेले सर्व आरोप त्यांनी फेटाळून लावले.

****

वायनाड भूस्खलन दुर्घटनेतल्या पीडितांसाठी केंद्र सरकारनं पुनर्वसन निधी द्यावा, अशी मागणी लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी आज सदनात केली. या दुर्घटनेला राष्ट्रीय आपत्ती जाहीर करावं, अशी मागणीही त्यांनी केली. या दुर्घटनेच्या बचाव आणि मदत कार्यात उत्तम काम केल्याबद्दल राहुल गांधी यांनी केंद्र आणि राज्य सरकार, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, लष्कर, नौदल, तटरक्षक दल, अग्निशमन विभाग तसंच केरळलगतच्या राज्यांची प्रशंसा केली.

****

भारतीय रिझर्व्ह बँक –आरबीआयनं, विविध कृषी पूरक व्यवसायांसाठी कमी व्याजदरात अल्पावधीसाठी कर्ज उपलब्ध करून देण्याच्या सूचना बँकांना दिल्या आहेत. यानुसार, शेतकऱ्यांना ७ टक्के व्याजदरानं ३ लाख रुपयांपर्यंतचं कर्ज दिलं जाईल. विहित मुदतीत कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना व्याजात अतिरिक्त ३ टक्क्यांची सूट दिली जाणार आहे. हे अल्प मुदतीचं कर्ज मिळवण्यासाठी आधार क्रमांक आवश्यक असल्याचं आरबीआयनं म्हटलं आहे.

****

राज्यातल्या जनतेला पिण्यासाठी आणि शेतकऱ्यांना सिंचनासाठी पुरेसं पाणी उपलब्ध होण्यासाठी सध्याच्या जलप्रकल्पांची क्षमतावाढ करणं गरजेचं असल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटलं आहे. हिंगोली, बीड, सोलापूर आणि कोल्हापूर या जिल्ह्यांतल्या जलसंपदा विभागाशी संबंधित प्रलंबित योजनांच्या संदर्भात आज झालेल्या बैठकीत ते बोलत होते. नैसर्गिक स्त्रोतांचा वापर करून एका प्रकल्पातलं अतिरिक्त पाणी दुसऱ्या प्रकल्पात नेण्याचं नियोजन करावं, असे निर्देश त्यांनी दिले. या जिल्ह्यांत आवश्यक त्या ठिकाणी कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांचं रूपांतर बॅरेजेसमध्ये करून पाणी साठवण क्षमतेत वाढ करण्याची कार्यवाही गतीनं करण्याची सूचनाही पवार यांनी केली आहे.

****

राज्य सरकार येत्या ९ ऑगस्टपासून राज्यात हर घर तिरंगा अभियान मोठ्या प्रमाणावर राबवणार असून, अडीच कोटी घरांवर तिरंगा फडकवण्यासह विविध कार्यक्रमांचं आयोजन करणार आहे. आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे.

शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर सिंचन योजना राबवून पावणे चार लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्यासह वैनगंगा - नळगंगा नदीजोड प्रकल्पालाही मंत्रिमंडळानं आज मान्यता दिली.

आदिवासी विभागातल्या प्राथमिक शिक्षकांना शिक्षण पात्रता परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी दोन वर्षे मुदतवाढ, विना परवानगी झाड तोडण्यासाठीच्या दंडाची रक्कम पन्नास हजार रुपये, लहान शहरांतल्या पायाभूत सुविधांना वेग देणं, इत्यादी निर्णयही आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आले.

****

भारत आणि श्रीलंकेदरम्यान कोलंबो इथं सुरू असलेल्या तिसऱ्या आणि अंतिम एकदिवसीय क्रिकेट सामन्यात श्रीलंकेनं भारताला २४९ धावांचं लक्ष्य दिलं आहे. श्रीलंकेनं नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करताना ५० षटकांत सात बाद २४८ धावा केल्या आहेत. भारताच्या रियान परागनं सर्वाधिक तीन बळी घेतले. श्रीलंका या मालिकेत शून्य एकने आघाडीवर आहे.

****

बीड जिल्ह्यात बोगस वैद्यकीय व्यवसायिक आढळल्यास कडक कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आज बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयात बोगस डॉक्टर पुनर्विलोकन समितीची जिल्हास्तरीय बैठक झाली, त्यात हा निर्णय घेण्यात आला. नागरिकांना बोगस डॉक्टर आढळल्यास त्यांनी ती माहिती प्रशासनाला द्यावी, असं आवाहनही या बैठकीतून करण्यात आलं आहे.

****

नांदेड जिल्ह्यातल्या, क्षयरोगमुक्त असलेल्या शहाऐंशी ग्रामपंचायतींचा आज गौरव करण्यात आला. जिल्हाधिकारी अभिजीत राऊत आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांनी यावेळी, संपूर्ण जिल्हा क्षयरोगमुक्त करण्याच्या दृष्टीनं जिल्ह्यातल्या आरोग्य संस्थांना मार्गदर्शन केलं.

****

जागतिक स्तनपान सप्ताहानिमित्त परभणी इथे स्तनपान जागरूकता सप्ताह राबवण्यात आला. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातलं सामुदायिक विज्ञान महाविद्यालय आणि परभणीचं जिल्हा रुग्णालय यांनी संयुक्तपणे हा उपक्रम राबवला. यावेळी महाविद्यालयातल्या विद्यार्थिनींनी विविध कार्यक्रमांमधून स्तन्यदा मातांना स्तनपानाचं महत्व सांगितलं.

****

सुधारित फौजदारी कायद्यांविषयी माहिती देणाऱ्या मल्टीमिडिया चित्र प्रदर्शनाचं आज नांदेड जिल्हा आणि सत्र न्यायालयात उद्घाटन झालं. नांदेड इथला माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचा केंद्रीय संचार ब्यूरो, जिल्हा विधि सेवा प्राधिकरण, जिल्हा व सत्र न्यायालय आणि नांदेडचं जिल्हा माहिती कार्यालय, यांनी संयुक्तपणे हे प्रदर्शन आयोजित केलं आहे. सोप्या भाषेत साकारण्यात आलेलं हे प्रदर्शन उद्यासुद्धा सकाळी १० पासून संध्याकाळी ६ वाजेपर्यंत सर्वांसाठी खुलं असणार आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं आज कोविडचे तीन नवे रुग्ण आढळले, सध्या शहरात कोविडचे १३ सक्रीय रुग्ण असल्याचं, महानगरपालिकेनं प्रसिद्ध केलेल्या अहवालात म्हटलं आहे.

****

धाराशिव जिल्ह्यातल्या आठ तालुक्यातल्या सातशे वीस गावात घनकचरा आणि सांडपाणी व्यवस्थापनासह स्वच्छतेची विविध कामं पूर्ण झाली आहेत.

****